# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/03/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो. स्टे. भिवापूर** :— अंतर्गत नांद भिवापूर येथे दि. २८/०३/२०२३ चे ११/४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— भारत गंगाधर मेश्राम, वय ५६ वर्ष, रा. ग्रामपंचायत नांद ता. भिवापूर हे ग्रामविकास अधिकारी असुन ग्रामपंचायतमध्ये संरपच, ग्रामसेवक, सदस्यगण व ग्रामपंचायत अखत्यारीत येणारे कर्मचारी यांचे उपस्थितीत ग्रामपंचायत मासीक सभा घेत असतांना यातील तिन्ही आरोपीं नामे— १) इमरतसींग उर्फ भिमसींग प्रीतमसींग बावरी २) महेद्रसींग भोंलासींग बावरी ३) एक अनोळखी महीला यांनी आमच्या घराजवळ अद्यापपर्यंत सींमेंट रस्ता बांधकाम केला नाही तर अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. आमच कोण काय बिघडवतो असे म्हणाले तसेच संरपच ग्रामसेवक, सदस्यगण व ग्रामपंचायत अखत्यारीत येणारे कर्मचारी यांना केव्हाही मारहाण करून त्यांचे कडून अपमान होण्याचा धोका वाढलेला आहे व सदर आरोपी यांनी सरकारी कार्यात अडथळा निर्माण करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५३, ३२३ ५०४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ अशोकसींग ठाकूर ब.न. १२७० पोस्टे भिवापूर हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. बोरी** :— अंतर्गत हनुमान नगर बोरी येथे दि. १९/०३/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. पिंकी लोकेश उके, वय २४ वर्ष रा. बोरखेडी रेल्वे बोरी ही मागील २ महिन्यापासून तिची मामी नामे— गिता परतेक यांचेकडे राहते ७ वर्षाची असतांना वडील मरण पावले आई सुनीता ही सुध्दा १३ वर्षापुर्वी मरण पावली फिर्यादीचे मागील ८ वर्षापासून लोकेश उके याचे सोबत प्रेम संबध होते यावरून एकमेकांच्या घरच्या संमतीने दि. १९.१.२०२२ रोजी नागपूर कोर्टात कोर्ट मॅरीज केले लग्नानतंर पतीचे घरी सासू सासरे भासरे जावू असे सर्व मिळून एकाच घरात राहतात. लग्नानंतर २ महिने घरचे चांगले राहिले पतीवर लग्नाआधी बजाज फायनान्सचे साठ हजार रू. कर्ज होते त्यामुळे पती सासू सासरे भासरे यांनी फिर्यादीला तिचे मावशीकडून पन्नास हजार रू. घेवून ये तेव्हा मावशी मनिशा मडावी हीने लग्नानंतर ३ महिन्याचे फिर्यादीचे पतीला पन्नास हजार रू. दिले. त्यानंतर पती सासु सासरे भासरे हे मावशीकडून पैसे घेवून ये असे म्हणून पती मारहाण करून शारीरीक व मानसिक त्रास देवू लागले फिर्यादी ही नांदण्यासाठी तयार असतांना सुध्दा तिला आपले घरी ठेवत नाही आंदनमध्ये आलेले मंगळसुत्र व जोडवे जबरदस्तीने घेवून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे **आरोपी नामे— १) लोकेश हरीभाउ उके, वय २९ वर्ष २) निर्मला हरीभाउ उके ३) हरीभाउ उके सर्व रा. हनुमान नगर बुटीबोरी** यांचेविरूद्ध कलम ४९८(अ), ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१४९१ टेकाम मो. नं ९०२१००७३२१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर